| Names of Trustees | विश्वस्तांची नावे |
| --- | --- |
| 1. Dr. Ainapure Vilas, President | डॉ. ऐनापुरे विलास, अध्यक्ष |
| 2. Shri. Joshi Shrikant, Secretary | श्री. जोशी श्रीकांत, कार्यवाह |
| 3. Smt. Raykar Sanjeevani, Treasurer | श्रीमती रायकर संजीवनी, कोषाध्यक्षा |
| 4. Smt. Barve Usha | श्रीमती बर्वे उषा |
| 5. Shri. Desai Shrikrishna | श्री. देसाई श्रीकृष्ण |
| 6. Adv. Gaonkar Prasad | ॲड. गांवकर प्रसाद |
| 7. Shri. Kadhe Janardan | श्री. कढे जनार्दन |
| 8. Dr. S. Raman Srinivasa | डॉ. एस.रामन श्रीनिवासा |
| 9. Shri. Saraf Nagnath | श्री. सराफ नागनाथ |
| 10. Shri. Vaidya Ramchandra | श्री. वैद्य रामचंद्र |

| Names of Managing Committee Members | कार्यकारिणी सदस्यांची नावे |
| --- | --- |
| 1. Smt. Gadre Anjali, Chairperson | श्रीमती गद्रे अंजली, कार्याध्यक्षा |
| 2. Shri. Joshi Shrikant, Secretary | श्री. जोशी श्रीकांत,कार्यवाह |
| 3. Smt. Raykar Sanjeevani, Treasurer | श्रीमती रायकर संजीवनी, कोषाध्यक्षा |
| 4. Shri. Abhyankar Dilip, Member | श्री. अभ्यंकर दिलीप, सदस्य |
| 5. Smt. Dhakras Sandhya, Member | श्रीमती धाक्रस संध्या, सदस्य |
| 6. Smt. Joshi Shobha, Member | श्रीमती जोशी शोभा, सदस्य |
| 7. Shri. Pandit Uday, Member | श्री. पंडीत उदय , सदस्य |
| 8. Shri. Sathe Vidyadhar, Member | श्री. साठे विद्याधर, सदस्य |
| 9. Shri. Vaidya Vishwas, Member | श्री. वैद्य विश्वास, सदस्य |


## AUDITORS

**M/s. CVK & Associates (Chartered Accountant)**
103, Varad Laxmi, Gokhale Road,
Mulund (East), Mumbai 400 081.

दृष्टीक्षेपात वात्सल्य

VATSALYA AT A GLANCE

| | |
|---|---|
| संस्थेचे नाव<br>Name of Institution | **वात्सल्य ट्रस्ट, मुंबई**<br>**VATSALYA TRUST, MUMBAI** |
| सार्वजनिक विश्वस्त संस्थेचा नोंदणीक्रमांक<br>Registration No.under Maharashtra | **ई ९१८० / मुंबई ८.२.८३**<br>**E. 9180 / BOM 8.2.83** |
| आयकर खात्याच्या कलम १२ (अ) खाली नोंदणीक्रमांक<br>Registration No. under Section 12 (A) of Income Tax Act | **TR/16007, dt. 12.7.83** |
| आयकर खात्याच्या कलम ८० (जी) खाली नोंदणीक्रमांक<br>Registration No. under Section 80 (G) of Income Tax Act | **DIT(E)MC/80 (G) 1615/2009 Dt. 1.4.2009** |
| विदेशातून देणग्या घेण्याबाबत केंद्र सरकारच्या गृहमंत्रालयाकडून मिळालेल्या प्रमाणपत्राचा नोंदणी क्र. Registration under Foreign Exchange Regulation Act, 1976 | FCRA No. : **083780862** |
| PAN NO. | **AAATV0345H** |

## Addresses, Telephone Nos. and Email ids of our Projects

**KANJURMARG**

Near Kanjurmarg Police Station, Kanjurmarg (East), Mumbai 400 042.
Tel. Nos. 2578 2958 / 2579 4798 / 2578 4810 / 8833243150 / 8833243149
Email id : vatsalyatrustmumbai@gm.ail.com

**SANPADA**

Plot No. 11, Sector No.2, Near Oriental College, Sanpada, Navi Mumbai 400 705.
Tel. Nos. 2775 7390 / 2775 3689 / 8422883148/ 8833243141 / 8591046910 (WhatsApp )
Email id : vatsalyatrust_sanpada@yahoo.com

**ALIBAG**

House No. 1510-B-2, Behind Mayur Bakery, Alibag, Dist. Raigad 402 201.
Tel. Nos. 02141- 220216
Email id : vatsalyatrustalibag@gmail.com

**BADLAPUR**

Mauje Bhoj, Survey No.12/1, 12/2, 13/1, Badlapur, Dist. Thane

# Names of Banks and Account Nos. for ONLINE DONATION

**Beneficiary Name : VATSALYA TRUST MUMBAI**

1. **STATE BANK OF INDIA – Kanjur Marg**
   Branch Code – 06249
   IFSC Code – SBIN0006249
   Current Account No. – 35562836398
2. **STATE BANK OF INDIA – New Delhi (only for Foreign Donations)**
   Branch Code – 00691
   IFSC Code – SBIN0000691
   Swift Code – SBININ -BB 104
   Account No. – 40137265409
3. **INDIAN OVERSEAS BANK – Sanpada Project**
   IFSC Code – IOBA0001502
   Savings Account No. – 150201000001551
4. **BANK OF MAHARASHTRA – Alibag Project**
   IFSC Code – MAHB0000229
   Savings Account No. – 20109646941

**भारत सरकारद्वारे FCRA Act च्या सुधारित नियमावलीप्रमाणे संस्थेचा Foreign Account No. वरीलप्रमाणे आहे याची परदेशस्थ देणगीदारांनी कृपया नोंद घ्यावी.**

## नम्र विनंती

या अहवालाद्वारे आपणा सर्व देणगीदार / हितचिंतक यांस कळकळीची विनंती आहे की आपण आपली देणगी शक्यतो धनादेशाद्वारे अथवा ONLINE सेवेद्वारे द्यावी. जेणेकरून समाजातील वाईट घटक 'वात्सल्य' च्या नावाचा गैरफायदा घेऊन देणगी मिळवू शकणार नाही. तसेच देणगीदारांनी देणगी देताना आपला इमेल आय. डी.आणि मोबाईल क्रमांक प्रत्यक्ष किंवा संस्थेच्या इमेलवर जरूर कळवावा. त्यामुळे संस्थेचा वार्षिक अहवाल इमेलद्वारे पाठवणे आम्हाला सोपे जाईल. संस्थेचा इमेल आय. डी. - vatsalyatrustmumbai@gmail.com तसेच संस्थेची स्वतंत्र वेबसाईटदेखील आहे vatsalyatrustmumbai.org

'वात्सल्य' च्या नावाचे ओळखपत्र व पावतीपुस्तक नसलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे देणगीची रक्कम, धान्य, कपडे अथवा इतर वस्तुरूप देणगी देऊ नयेत. संस्थेच्या कार्यकर्त्यांकडे ओळखपत्र व पावतीपुस्तक दिलेलेच असते. कृपया देणगी देताना या सर्व बाबींची खातरजमा करून घ्यावी.

देणगीचा धनादेश **'वात्सल्य ट्रस्ट, मुंबई'/ 'Vatsalya Trust, Mumbai'** या नावाने काढावा.

ऑन लाईन पेमेंट साठी **Website Payment Gateway (SBI Collect) चा वापर करावा.**

**Master, VISA, RuPay, Credit / Debit Cards / Scan Pay अशा विविध कार्डचा वापर करूनही आपण देणग्या देऊ शकता.**



## श्रीमती संजीवनी हरी रायकर – श्रद्धांजली

सर्व हितचिंतक व देणगीदार यांना कळविण्यास अत्यंत दु:ख होत आहे की वात्सल्य ट्रस्ट, मुंबई संस्थेच्या संस्थापिका व कोषाध्यक्षा श्रीमती संजीवनी रायकर यांचे दि. ५ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी दु:खद निधन झाले. गौरवर्ण, बेताची उंची, अटकर बांधा, भव्य भालप्रदेश, खणखणीत आवाज, साधी राहणी असे रायकर ताईंचे वर्णन करता येईल. बाल मोहन विद्यामंदिर दादर येथील विद्यार्थीप्रिय रायकर ताई यांनी सलग तीन वेळा आमदारकी गाजवून लोकप्रिय आमदार होण्याची हॅट्रीक सहज साध्य केली. शिक्षक परिषदेच्या अध्यक्षा म्हणून त्यांनी खूप लोकप्रियता कमावली. सर्व शिक्षकवर्गाच्या त्या आदर्श होत्या.

फेब्रुवारी १९८३ साली, स्वत: त्या आणि कै. श्री. शि. द. आठवले, कै श्री. अनंतराव कुलकर्णी, कै. श्री. विनोद निजसुरे, कै. श्री. गजानन दामले हे चार अवलिये एकत्र आले आणि अनाथ व परित्यक्त बालकांसाठी एखादे सक्षम अनाथालय काढावे असा विचार उदयास आला. अनाथालयाचे कामकाज कसे चालते हे जवळून अनुभवण्यासाठी श्रीमती रायकर ताईंनी गोव्याच्या 'मातृछाया' संस्थेत दोन महिने मुक्काम केला. अशाच प्रकारची संस्था मुंबईत सुरु करायची असे या ५ जणांनी ठरवले आणि वात्सल्यचा जन्म झाला.

त्यांचे संस्थेवरील प्रेम, आपुलकी, जिव्हाळा वेळोवेळी प्रकट झाला आहे. आपली उज्ज्वल राजकीय कारकीर्द गाजवून त्यांनी स्वत:चा सर्व वेळ 'वात्सल्य ट्रस्ट'च्या अनाथ अर्भकांच्या सेवेत घालवला आहे. संस्थेच्या स्थापनेत त्यांचा पुढाकार होता. आपले सर्वस्व त्यांनी संस्थेच्या भरभराटीसाठी वेचले. त्यांच्या प्रयत्नानेच दत्तक मातेला बालसंगोपनासाठी ३ वर्षापर्यंतचे मुल दत्तक घेतल्यास ३ महिन्याची भरपगारी रजा मिळू लागली. त्यांनी दत्तक मातेला न्याय, समाधान, मातृत्वाचा हक्क मिळवून दिला. अनेक सामाजिक संस्थांच्या कार्यातही त्यांनी उल्लेखनीय सहभाग दिला.

ऑक्टोबर २०२० मध्ये त्यांना कोरोनाने ग्रासल पण त्यातूनही नव्या उभारीने त्या उभ्या राहिल्या. त्यांचा कणखरपणा एखाद्या तरुणालाही लाजवेल. त्यांची जगण्याची जिद्द अफाट होती. त्यांचे जाणे अजूनही खरे वाटत नाही. त्या आपल्यामध्ये आहेत असे मानून त्यांनी करून ठेवलेले कार्य त्याच निस्सीम भावनेने पुढे सुरु ठेवणे हीच आपणाकडून त्यांना दिलेली खरी श्रद्धांजली ठरेल.

**दि. १ एप्रिल २०२० ते दि. ३१ मार्च २०२१ चा वार्षिक अहवाल आपल्या समोर सादर करत आहोत.**
'वात्सल्य' चे सर्व कार्यकर्ते, देणगीदार व हितचिंतक यांचे मन:पूर्वक आभार !!

## विश्वस्त मंडळ व कार्यकारिणी मंडळ

अहवाल सालात विश्वस्त व कार्यकारिणी मंडळामध्ये काहीही बदल झाले नाहीत.

## संस्थेचे लेखापरिक्षक

२०२० - २१ या आर्थिक वर्षात संस्थेच्या लेखापरिक्षणाचे काम मुलुंड येथील **M/s.CVK & Associates** या आस्थापनेकडे दिले आहे.

**COVID 19 मुळे २०२० -२१ या अहवालसालात वार्षिक मेळावा होऊ शकला नाही.**

## वार्षिक तपासणी

जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, चेंबूर येथील संरक्षण अधिकारी यांनी वेळोवेळी संस्थेला भेट देऊन संस्थेचे दस्तऐवज तपासून त्यावे मोलाच्या सूचना दिल्या आहेत. वात्सल्य ट्रस्टमधील मुलांसाठी बनवले जाणारे जेवण व संस्थेतील स्वच्छता याची सर्व अधिका-यांनी कौतुक केले आहे.

या अहवाल सालात **COVID 19** च्या प्रादुर्भाव पहाता त्या अनुषंगाने कांजूर व सानपाडा येथे वार्षिक तपासणी online पद्धतीने घेतली गेली.

महाराष्ट्र शासनाच्या सर्व अधिका-यांनी वेळोवेळी दिलेल्या उत्तम सहकार्याबद्दल व मार्गदर्शनाबद्दल संस्थेच्या वतीने मी आभार मानतो.

## प्रशासन

'वात्सल्य ट्रस्ट' चे ११ विश्वस्त आहेत. त्यापैकी ३ कायमस्वरूपी व ८ बदलत्या स्वरुपात आहेत. बदलत्या स्वरूपातील विश्वस्तांची मुदत ६ वर्ष आहे. मात्र दर ३ वर्षांनी ४ विश्वस्त ज्यांचा ६ वर्षांचा कार्यकाल पूर्ण झाला आहे ते निवृत्त होतात. विश्वस्तांची बैठक दर ३ महिन्यांनी तर कार्यकारिणी मंडळाची बैठक दर महिन्याला घेतली जाते. त्याखेरीज विश्वस्त वेळोवेळी सभा घेवून महत्वाच्या विषयांवर चर्चा करतात व निर्णय घेतात. विश्वस्तांच्या बैठकीत महत्वाच्या गोष्टींचं निवेदन केलं जातं व आवश्यक ते धोरणात्मक निर्णय घेतले जातात. सभेच्या इतिवृत्तांची नोंद ठेवली जाते. संस्थेच्या ध्येयधोरणांनुसार संस्थेच्या कामाची दिशा संस्थेच्या विश्वस्तांकडून ठरवली जाते. संस्थेच्या कार्यकारिणी मंडळातील सदस्य संस्थेच्या दैनंदिन कामकाजाचं आयोजन करतात व त्यावर देखरेख करतात.

'वात्सल्य' चे विश्वस्त व कार्यकारिणी सदस्य कुठल्याही प्रकारचे मानधन घेत नाहीत. आजपर्यंत कोणत्याही विश्वस्तांचा अथवा सदस्याचा परदेश दौ-याचा खर्च संस्थेने केलेला नाही.

## आस्थापनावरील खर्च

| **कर्मचारी** | **महिला** | **पुरुष** | **एकूण** |
|---|---|---|---|
| दरमहा रु. १०,०००/- पर्यंत | **९५** | **११** | **१०६** |
| दरमहा रु. १०,००१/- ते रु. २५,०००/- पर्यंत | **६०** | **५** | **६५** |
| दरमहा रु. २५,००१/- ते रु. ३०,०००/- पर्यंत | **७** | **३** | **१०** |
| दरमहा रु. ३०,००१/- पेक्षा जास्त | **१** | **-** | **१** |
| एकूण | **१६३** | **१९** | **१८२** |

# कांजुरमार्ग

## अर्भकालय व दत्तक विधान

'वात्सल्य ट्रस्ट' मध्ये २०२०-२१ या वर्षात **१७** मुलं दाखल झाली त्यापैकी **२** मुलं हस्तांतरीत केली. अहवालसालात संस्थेने एकूण २५ मुलांपैकी **२३** मुलांना कायदेशीर बाबी पूर्ण करून दत्तक दिली गेली व **२** मुलं हस्तांतरीत केली गेली. यापैकी **५** मुलांचे परदेशी कुटुंबात पुनर्वसन करून दिले आहे.

संस्थेच्या सुरुवातीच्या काळापासून आजमितीपर्यंत एकूण **१२२१** मुलांना संस्थेने दत्तक पालक मिळवून दिले आहेत. सर्व दत्तक मुलांची प्रगती समाधानकारक आहे हे सांगायला मला विशेष अभिमान वाटतो.

संस्थेत सध्या **२१** अर्भके आणि **८** विशेष मुले अशी एकूण **२९** मुले वास्तव्यास आहेत. त्याखेरीज **६** मुले इतर संस्थांमध्ये शिक्षण व विशेष देखभालीसाठी दाखल करण्यात आली आहेत.

वात्सल्यमध्ये अगदी एक दिवसापासुनची तान्ही बाळे दाखल केली जातात. वात्सल्यमधील सेवाभावाने काम करणाऱ्या सेविका, परिचारिका आणि पर्यवेक्षिका अथक प्रयत्नाने ह्या मुलांचे पालनपोषण करतात. सेविका आईच्या मायेने त्यांचे संगोपन करतात. कर्मचाऱ्यांच्या ह्या मानवतापूर्ण कार्याचा 'वात्सल्य' ऋणी आहे.



## पुनर्वसन केंद्र –

पुनर्वसन केंद्र कांजुरमार्ग / सानपाडा / अलिबाग

मुलं आणि पालक यांच्या सहयोगातून नियमित विकास खुंटलेल्या मुलांच्या समर्थनार्थ व्यावसायिक तज्ज्ञांच्या देखरेखीखाली हे केंद्र कार्यक्रम राबवतं.

पुनर्वसन केंद्राच्या कामामध्ये मुख्यत: तीन केंद्रित विभागांचा समावेश होतो.

- **आकार** – ह्या केंद्रात फिजिओ थेरपी, स्पीच आणि ऑक्यूपेशनल थेरपी यांसारख्या उपचार पद्धतींचा वापर केला जातो. यामुळे मुलांच्या शारीरिक व मानसिक प्रगतीतील अडथळे यामुळे होणारे अनेक विकार जसे की मानसिक दुर्बलता, भाषा आणि उच्चार यांसारख्या समस्यांवर इलाज होऊ शकतो.
- **ख़ुशी** - बालक आणि पालक मार्गदर्शन केंद्र – हे केंद्र मुलांच्या वागणूक, भावनात्मक, शैक्षणिक अशा विविध समस्या यांवर उपचार करतं. यासाठी केंद्र मानसोपचार, कौटुंबिक उपचार, मुलांवर उपचार, पालकांचा कौशल्य विकास आणि शिक्षकांची संवेदनशीलता आदी कार्यक्षम करण्यास मदत करते.
- **दिशा** – यामध्ये पुनर्वसनासाठी लागणारी साहित्य आणि मदत विशेष गरजा असणा-या मुलांना व इतर सामाजिक संस्थांच्या माध्यमातून वात्सल्यतर्फे पुरवली जातात.

विशेष गरजा असणा-या मुलांच्या विकासासाठी असलेले सर्व कार्यक्रम पुनर्वसन केंद्रामार्फत समग्र दृष्टीकोनातून राबवले जातात.
वर उल्लेखिलेल्या तीन केंद्रांमध्ये विशेष गरजा असलेल्या २०० हून अधिक मुलांना नियमित उपचार दिले जातात. 'दिशा' कार्यक्रमांतर्गत १०० हून अधिक मुलांना २०२०-२१ या आर्थिक वर्षात पुनर्वसन साहित्य आणि मदत दिली गेली. विशेष गरजा असणा-या मुलांना मदत करणा-या व्यक्ती आणि पालक यांमध्ये संस्थेकडून दिल्या जाणा-या उपचारांविषयी जागरूकता यावी यासाठी प्रशिक्षण दिले जाते.

**पुनर्वसन केंद्र (कांजुरमार्ग) –** वात्सल्य ट्रस्ट, मुंबई संस्थेने २००४ -०५ मध्ये विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी पुनर्वसन केंद्र सुरु केलं. यासाठी संस्थेला PWD कायदा १९९५ अंतर्गत अपंग आयुक्तालय (पुणे) यांच्याकडून परवाना प्राप्त झाला. तेव्हापासून आतापर्यंत २००० हून अधिक मुलांना तज्ज्ञांकडून उपचार दिले जातात. २०२०-२१ मध्ये या केंद्राने पुढील कार्यक्रम आयोजित केले.






दिवाळी आणि क्रीडा स्पर्धा, याशिवाय स्वातंत्र्यदिन, गणेशोत्सव, बालदिन इ. अक्षर प्रकाश मतिमंदनिवासी विद्यालय पुणे यांच्यातर्फे आयोजित केलेल्या हस्तकला स्पर्धेत संस्थेतील निवासी विशेष मुलांनी भाग घेतला होता. या स्पर्धेत संस्थेतील 'वरूण' नावाच्या मुलाला मुखपट्टी (मास्क)साठी द्वितीय पारितोषिक मिळाले. संस्था विशेष मुलांच्या पालकांना इतर संस्थांनी आयोजित केलेल्या ऑनलाईन स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी प्रोत्साहित करते. लॉकडाऊनची परिस्थिती लक्षात घेऊन संस्थेने पालकांच्या आणि मुलांच्या मदतीसाठी गृह कार्यक्रम आयोजित केला व दूरसंभाषण, व्हॉट्स-अप, दृक्श्राव्य अशा माध्यमांतून प्रशिक्षण चालू ठेवलं.
केंद्रातील उपचार करणारे तज्ज्ञ तिन्ही केंद्रात जवळजवळ १५० पालकांच्या संपर्कात होते. फाईन मोटार कौशल्य , दृश्य मोटार समन्वय, शब्दसंग्रह, व्याकरण यांवर आधारित कार्यक्रम बनविला गेला. घरात सापडणा-या सामान्य गोष्टी वापरून करता येईल असा कार्यक्रम रचला गेला. दर आठवड्याला अशा ३-४ कार्यक्रमांचा संच आणि मार्गदर्शन पालकांना दिलं जायचं. मुलांना कौशल्य विकास कार्यपत्रक दिलं जायचं. पालकांकडून याविषयीचे अभिप्राय आणि छायाचित्रं मागवलं जायचं.
दिवाळीत संस्थेतील निवासी मुलांनी ३००० पणत्या रंगवल्या त्यातल्या २००० पणत्या विकल्या गेल्या. या रंगीत आणि आनंददायी कार्यक्रमामुळे सर्वांनाच मजा आली.

पालकांशी आणि केंद्रातील कर्मचा-यांशी चर्चा करून सुरक्षित अंतर व स्वच्छतेविषयीच्या सरकारी मार्गदर्शक तत्वांनुसार प्रत्यक्ष उपचारांची सत्रं संस्थेच्या तिनही केंद्रांवर सुरु झाली.





**'दिशा' कार्यक्रम**

या कार्यक्रमाद्वारे संस्था अधिकाधिक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचू इच्छिते. हे सर्व संस्थेने जोडलेल्या इतर सामाजिक संस्था, व्यक्ती यांच्यामार्फत होते.

ऑर्थोसिस शिबीर – यावर्षी दोनपैकी एक ऑर्थोसिस शिबीर कांजुरमार्ग केंद्रामध्ये आयोजित केलं गेलं. बाह्य रुग्ण विभागातील आणि AWMH मधील दहा लाभार्थ्यांना फायदा झाला.





**पुनर्वसन केंद्र (सानपाडा)** – सानपाडा येथील पुनर्वसन केंद्र २०१६ मध्ये स्थापन झालं. सुरुवातीला तिथे वृद्धांसाठी फिजीओ उपचार चालायचे. ह्याला तेरणा वैद्यकीय कॉलेजातील विद्यार्थ्यांचा चांगला हातभार लागतो. हे पुनर्वसन केंद्रही व्यवस्थित सुरु आहे. अह्वालसालात एकूण ३० मुलानी सादर केंद्राचा लाभ घेतला.

**कार्यशाळा आणि कार्यक्रम**

| **दिनांक** | **विषय** |
|---|---|
| ७ जुलै २०२० | गुरुपौर्णिमा |
| १५ ऑगस्ट २०२० | स्वातंत्र्यदिन |
| २१ ऑगस्ट २०२० | वृद्ध नागरिक दिन |
| १४ नोव्हेंबर २०२० | दिवाळी |
| २५ डिसेंबर २०२० | नाताळ |

**पुनर्वसन केंद्र (अलिबाग)** – अलिबाग – रायगड येथील पुनर्वसन केंद्राने एक ऑर्थोसिस शिबीर आयोजित केलं होतं. १६ विद्यार्थ्यांसाठी रायगड जिल्ह्यात स्प्लींट (SPLINT) आणि श्रवणयंत्र यासाठी शिबीर आयोजित केलं गेलं.

| **दिनांक** | **विषय** | **लाभार्थी संख्या** |
|---|---|---|
| ६ मार्च २०२१ | अलिबाग (ऑर्थोसिस) | ६ |
| ६ मार्च २०२१ | अलिबाग (श्रवणयंत्र) | १० |

## रुग्णसहाय्यक प्रशिक्षण केंद्र

**रुग्णसहाय्यक प्रशिक्षण केंद्र (कांजुरमार्ग) -** वात्सल्यचा रुग्णसहाय्यक प्रशिक्षण केंद्र सुरु होवून १४ वर्षे झाली. २०२०-२१ मधील महामारीच्या प्रादुर्भावामुळे या वर्षी एकूण ३१ मुलींनी वर्षभराच्या प्रशिक्षण वर्गात प्रवेश घेतला. डॉ. ज्योती जाधव, डॉ. अलका बेडेकर, श्रीमती. चव्हाण आणि श्रीमती रेणुका साळगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासक्रम पूर्ण केला गेला. विद्यार्थिनींना हिरामोंगी हॉस्पिटल, मुलुंड व गणात्रा हॉस्पिटलमध्ये प्रात्यक्षिकांचा अभ्यास करण्याची संधी दिल्याबद्दल मी दोन्ही हॉस्पिटलच्या व्यवस्थापनाचा आभारी आहे.




वात्सल्यतर्फे ह्या विद्यार्थीनीना इंग्रजी संभाषणकलेचे शिक्षण तसेच संगणकाचे उपयुक्त ज्ञानही दिले जाते ज्यायोगे त्यांना नोकरीच्या अधिक संधी उपलब्ध होतात व आधुनिक इस्पितळांच्या वातावरणात सहजरित्या रुळतात.

वात्सल्य ट्रस्ट मुंबई यांचा राजापूर, दापोली, लातूर, जालना ह्या चार ठिकाणी रुग्णसहाय्यक प्रशिक्षण केंद्र राबविण्याचा मानस आहे. त्यासाठीच्या प्राथमिक भेटी आणि बोलणी सुरु आहेत.

**रुग्णसहाय्यक प्रशिक्षण केंद्र (सानपाडा) -** सानपाडा प्रकल्पातील रुग्णसहाय्यक प्रशिक्षण अभ्यासक्रम हा नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठाशी संलग्न आहे. अहवालसालात या अभ्यासक्रमात १० विद्यार्थिनींना प्रवेश देण्यात आला. डॉ. ज्योती जाधव, सिस्टर श्रीमती रेणुका साळगावकर, सिस्टर श्रीमती क्षमा पेंडसे यांनी विद्यार्थिनींना विविध विषय शिकविले. ऐरोली येथील इंद्रावती इस्पितळात विद्यार्थिनींना प्रात्यक्षिक शिक्षण दिले गेले.

इंद्रावती इस्पितळ, ऐरोली येथील मेडीकल डिरेक्टर डॉ. उमेश तेलतुंबडे, सि.इ.ओ. श्री. शंकर चव्हाण आणि श्रीमती दिपाली खाडे यांनी दिलेल्या मार्गदर्शना बद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

**वाळवंडा केंद्र** – पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील वाळवंडा येथे 2019 पासून रुग्ण सहाय्यक प्रशिक्षण केंद्र वात्सल्यतर्फे सुरु करण्यात आले. 'माऊली शिक्षण प्रसारक मंडळ, वाळवंडा ' यांच्या सहाय्याने 25 मुलीना प्रशिक्षण देण्यात आले.

करोनाच्या प्रदुर्भावामुळे सदरील शिक्षण मुख्यतः ऑनलाइन पद्धतीने देण्यात आले.

## संगणक प्रशिक्षण केंद्र

वात्सल्यतर्फे 2006 सालापासून कांजूर येथे तर 2012 सालापासून सानपाडा संगणक प्रशिक्षण वर्ग चालवण्यात येतात. अहवाल सालात करोनाच्या प्रदुर्भावामुळे कांजूर व सानपाडा येथे मुख्यतः ऑनलाइन पद्धतीने संगणक प्रशिक्षण देण्यात आले.




आर्थिक दृष्ट्या कमजोर असणाऱ्या वर्गातील मूला-मुलींना तसेच तरुण-तरुणींना संगणक प्रशिक्षण द्वारे सक्षम करण्याचे कार्य वात्सल्यतर्फे केले जाते. MKCL चे विविध अभ्यासक्रम सदर संगणक प्रशिक्षण वर्गात गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मोफत अथवा अत्यल्प शुल्क आकारून शिकाविले जातात. ह्यावर्षी कांजूर येथे 104 आणि सानपाडा येथून 66 विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले.



येत्या आर्थिक वर्षात ई – विद्या कार्यक्रमा अंतर्गत MSCIT शिवाय DTP, ॲडवांस टॅलि, ॲडवांस एक्सेल, डिजिटल मार्केटिंग, हार्डवेअर आणि नेटवर्किंग चे MCKL तसेच ITES चे संगणक प्रशिक्षण अभ्यासक्रम कुर्ला, अलिबाग, पाली, लातूर, राजापूर, रत्नागिरी, दापोली, उत्तण (भायंदर), उल्हासनगर येथे सुरू करण्याचा मानस आहे व त्या दृष्टीने संस्थेने ठोस पाऊले उचलली आहेत.

## ड्राइव विथ प्राइड




वार्षिक अहवाल २०२० – २१ या वर्षात ड्राइव विथ प्राइड या उपक्रमाचा ९९ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. यापैकी ७९ विद्यार्थी पालघर जिल्ह्यातील तलासरी, मोखाडा, जव्हार या भागांतून तर इतर नंदुरबार जिल्ह्यातील

तळोदा येथून होत्या. ‘शबरी सेवा समिती’ (जव्हार आणि तळोदा), ‘स्नेह समाज उत्थान संस्था’ (तलासरी) आणि ‘परिवर्तन महिला मंडळ’ (मोखाडा) या तळागाळात कार्यरत असणा-या सेवाभावी संस्थांबरोबर काम करून तेथील तरुणांना चारचाकी वाहन चालवण्याचं प्रशिक्षण दिलं गेल. या प्रशिक्षणामुळे त्या सर्वांची रोजगारक्षमता वाढली आणि स्वयंरोजगार निर्माण होण्याची शक्यताही वाढली.

हे चारचाकी वाहन चालवण्याचं प्रशिक्षण ज्यांना कौशल्य विकास आणि रोजगाराची कमी संधी उपलब्ध आहे अशा आदिवासी बहुल भागातील तरुणांना लक्ष्य ठेऊन केलं आहे. यामुळे त्या तरूणांचा सामाजिक, आर्थिक स्तर उंचावण्यासाठी नक्कीच मदत होईल. जव्हार येथील या प्रशिक्षण वर्गातिल प्रशिक्षित एक विद्यार्थी श्री. संतोष त्यागी यानी कर्ज काढून एक व्हॅन विकत घेतली व त्या मार्फत ठाणे व आजूबाजूच्या दुकानांना किराणा सामान आणून देण्याचे काम केले. यामुळे त्याच्या उत्पन्नात कैक पटींनी वाढ झाली.

सध्या कांजुरमार्ग येथे २० विद्यर्थ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. हे सर्वजण अन्नपदार्थ पुरवण्याचा, केक बनवून विकण्याचा तसेच किराणामालाच्या वस्तू पोहोचवण्याचा व्यवसाय करतात. हे प्रशिक्षण नक्कीच त्यांना स्वावलंबी बनवत आहे. या प्रशिक्षण वर्गातील एक विद्यार्थिनी श्रीमती पूजा पटेल ही तिच्या कामाच्या वेळेनंतर रिक्षा चालवते आणि तिच्या कुटुंबाला अधिक आर्थिक हातभार लावते.

भावी काळात ‘ग्लोबल राईट्स फाऊंडेशन’ – उल्हासनगर या संस्थेसोबत वात्सल्य ट्रस्ट तृतीय पंथीयांसाठी रिक्षा प्रशिक्षणाचा कार्यक्रम करणार आहे. संस्था फोर्कलिफ्ट व बांधकामात उपयोगी पडणारी वाहने चालवण्याचे प्रशिक्षण देणारा उपक्रम गरजू लोकांसाठी करणार आहोत.

निष्कर्ष काढावयाचा झाला तर हे वर्ष समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचून त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी नक्कीच फलदायी ठरलं.

## निधी संकलन

संस्थेचा आर्थिक डोलारा हा सर्वस्वी हितचिंतक / देणगीदार यांच्या औदार्यामुळेच उभा रहातो. जुनी कार्यकर्त्यांची पिढी नव्या पिढीसमोर नि:स्वार्थतेने काम करण्याचा वसा देऊन गेली आहे. आपल्यासारख्या संस्थेवर भरभरून प्रेम करणा-या दानशूर देणगीदारांचा मी मनापासून आभारी आहे. आपण दिलेल्या निधीचा विनियोग हा सद्कारणी केला जाईल असा आपला संस्थेवर विश्वास आहे आणि या आपल्या विश्वासावरच संस्था उत्तमरीत्या कार्यरत आहे.

संस्थेची अहवालसालातील आर्थिक परिस्थिती समाधानकारक आहे. प्रत्येक देणगीदार मग तो कितीका निधी देणारा असो, संस्थेसाठी महत्वाचाच आहे.

परंतु कागद व छपाईचे वाढलेले दर लक्षात घेता अहवालसालात रु. २५,०००/- व त्यापेक्षा जास्त निधी दिलेल्या देणगीदारांची नावेच छापत आहोत याची कृपया नोंद घ्यावी.

**अहवालसालातील काही प्रमुख देणग्या**

| | |
|---|---|
| श्री. गद्रे सुनील श्रीकांत – डोंबिवली | रु. १,५०,०००/- |
| अजयदीप कन्सट्रक्शन प्रा. लि. – सीवूड्स | रु. १,२५,०००/- |
| श्री. पेंडसे वैभव विलास – बोरीवली | रु. १,२१,०००/- |
| रोटरी पुणे प्राइड फाऊंडेशन | रु. १,२१,०००/- |
| श्री. नेने गजानन – मुलुंड | रु. १,१०,०००/- |
| श्री. वसवडा सरल – वडाळा | रु. १,०१,०००/- |

**रु. १,००,०००/- प्रत्येकी**

श्री. भिडे उमेश – अंधेरी, श्रीमती कडांबी अरुंधती – बँगलोर, इनेम नॉस्ट्रम रेमेडीज प्रा. लि. – अंधेरी, कॅ. जोशी डी. व्हि. – गोरेगाव, श्रीमती कोठारे सुनिता – अंधेरी, श्री. पाटील पद्माकर – गोरेगाव, श्री. पिळगावकर सुधीर व प्रतिभा – मुलुंड, श्रीमती प्रभू मिनाक्षी – बँगलोर

**रु. ७५,०००/- प्रत्येकी**

श्री. बागवे लौकिक – भांडूप, श्री. घुर्ये अनंत – ठाणे, श्री. जुन्नरकर अनंत – ठाणे, श्री.थनिगेव जे.

रु. २५,०००/- व त्यापेक्षा जास्त देणगी दिलेल्या देणगीदारांची नावे परिशिष्ट **'अ'** मध्ये दिली आहेत. सर्व देणगीदारांचे खूप खूप आभार !

## कायम ठेव योजना

कायम ठेव योजनेअंतर्गत मिळालेल्या देणग्यांची रक्कम सरकारी रोखे किंवा राष्ट्रीयकृत बँका यांत गुंतवली जाते. या रकमेतून मिळणाऱ्या व्याजाचा विनियोग देणगीदाराच्या सूचनेनुसार त्यांच्या कुटुंबातील आप्तांच्या स्मरणार्थ / जन्मदिवसाप्रीत्यर्थ अथवा वाढदिवसाप्रीत्यर्थ एखाद्या विशिष्ट दिवशी संस्थेतील निवासी मुलांना दुध / खाऊ इ. देण्यासाठी केला जातो. त्यासंबंधी देणगीदाराला संस्थेकडून पत्राद्वारे कळवले जाते. जेणेकरून देणगीदारांशी संस्थेचा ऋणानुबंध कायम राहतो. या योजनेअंतर्गत एकच देणगीदार निरनिराळ्या कारणासाठी व निरनिराळ्या दिवसासाठीही देणगी देऊ शकतो.

**अहवालसालात मिळालेल्या काही प्रमुख देणग्या खालीलप्रमाणे**

**ठाण्याला राहणारे श्री. वाकणकर चन्द्रशेखर यांचे मी विशेष आभार मानतो. अहवालसालात त्यांनी संस्थेला रु. २०,००,०००/- इतकी भरघोस देणगी दिली. संस्थेचे ते नियमित देणगीदार आहेत.**

**रु. १,५०,०००/-**

श्री. हीर जयेश, श्री.लेले संजीव व सौ. उमा – सांताक्रूझ

**रु. १,२५,०००/-**

श्री. शेणॉय नित्यानंद – ठाणे

**रु. १,०१,०००/-**

श्री. कहाते यतीन – कांजुरमार्ग

**रु. १,००,०००/- प्रत्येकी**

श्रीमती आजगांवकर अनघा मधुसूदन – ठाणे, श्रीमती कमला वेंकटरामानी – पवई, श्री. कुलकर्णी दिलीप – ठाणे, श्री. महाजन मधुसूदन – ठाणे, श्री. महाजन सुबोध विजय – ठाणे, श्री. मराठे प्रभाकर – सांताक्रूझ, श्रीमती म्हशेळकर नलिनी कृष्णा – वरळी,श्री. शेणॉय नित्यानंद – ठाणे

**रु. ७५,०००/-**

श्रीमती मनोहर विद्या अशोक – बदलापूर

रु. २५,०००/- व त्यापेक्षा जास्त देणगी दिलेल्या देणगीदारांची नावे परिशिष्ट **'ब'** मध्ये दिली आहेत. सर्व देणगीदारांचे खूप खूप आभार !

## आर्थिक दत्तक योजना

या योजनेअंतर्गत काही देणगीदार आपल्या मासिक वेतनातून एखादी ठराविक रक्कम 'वात्सल्य' मधील बालकांच्या संगोपन व शिक्षणासाठी देण्गीस्वरुपात देतात. ही रक्कम देणगीदार आपल्या सोयीनुसार एकरकमी किंवा हफ्त्यानेही देऊ शकतात.

दुसरा पर्याय म्हणजे काही देणगीदार एखाद्या अर्भकाच्या दुधाचा / जेवणाचा अथवा शाळेत जाणा-या एखाद्या मुला / मुलीच्या शिक्षणाचा वार्षिक खर्च देतात.

**यासंबंधीचा खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे**

| | |
|---|---|
| एका मुलाचा १ महिन्याचा जेवणाचा खर्च | १,५००.०० |
| एका मुलाचा १ वर्षाचा जेवणाचा खर्च | १८,०००.०० |
| एका मुलाचा १ महिन्याचा दुधाचा खर्च | १,०००.०० |
| एका मुलाचा १ वर्षाचा दुधाचा खर्च | १२,०००.०० |

| | |
|---|---|
| एका मुलाचा १ महिन्याचा खर्च | २,२००.०० |
| एका विशेष मुलाचा १ महिन्याचा खर्च | ६,५००.०० |
| एका मुलाचा १ महिन्याचा शिक्षणाचा खर्च | १,५००.०० |
| एका मुलाचा १ वर्षाचा शिक्षणाचा खर्च | १८,०००.०० |
| सर्व मुलांचा १ दिवसाचा जेवणाचा खर्च | ७,०००.०० |
| सर्व मुलांचा १ वेळचा जेवणाचा खर्च | ३,५००.०० |
| सर्व मुलांचा १ वेळच्या नाश्त्याचा खर्च | १,५००.०० |

**अहवालसालात मिळालेल्या काही प्रमुख देणग्या खालीलप्रमाणे**

| | |
|---|---|
| श्री. हल्लूर अनंत – ठाणे | रु. १,२०,०००/- |
| श्री. कुलकर्णी मंदार – ठाणे | रु. ९६,०००/- |
| श्री. चोणकर प्रफुल्ल – मालाड | रु. ८०,०००/- |

## दिवाळी भेट कुपन्स योजना

दिवाळी भेट कुपन्स ही योजना देणगीदारांमध्ये सर्वात लोकप्रिय योजना आहे. दिवाळीच्या सुमारास संस्था रु. १०/-, रु. ५०/-, रु. १००/- अशा लहान रकमांची कुपन्स छापते व विविध कार्यालयात काम करणा-या संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून अथवा शाळांमधून या कुपन्सची विक्री केली जाते. रक्कम छोटी असल्याकारणाने या योजनेअंतर्गत संस्थेला लोक सहभाग चांगला मिळतो. संस्थेच्या कामाचा प्रचारही यामार्फत मोठ्या प्रमाणावर होतो.

परंतु यावर्षी कोव्हीडच्या महामारीमुळे दिवाळी भेट कुपन्स छापली गेली नाहीत. त्यामुळे अहवालसालात या योजनेअंतर्गत काही निधी जमला नाही.

## वस्तुरूप देणगी

काही ठळक वस्तुरूप देणग्या खालीलप्रमाणे

**श्री. सुमित कानुगा – कांजुरमार्ग - रोजचे दुध, दुधपावडर (Lactogen) व धान्य**

**श्री. शौर्य जग्गी, चेंबूर - महिन्याभराची भाजी, फळे**

श्रीमती भोसले स्वेतलाना - दुधपावडर (Lactogen, Nestum)

श्रीमती वढावकर मेघा – २ Oxygen Concentrator

श्री. जोशी जयंत - २ संगणक

श्री. अमित / राजू / हरीश / अजय / सौरभ / रवी / अवधेश - दुधपावडर (Lactogen) व फळे

| | |
|---|---|
| रोटरी क्लब ऑफ मुलुंड लेकसाईड - | दुधपावडर (Lactogen) व २ कपाटे |
| चिन्मय सेवा ट्रस्ट – | धान्य |
| स्वयंसिद्ध नारी प्रतिष्ठान – | दुधपावडर (Lactogen) |
| श्री. गम्बानी सुनील - | धान्य |
| स्काय फाऊंडेशन - | baby products |

## परदेशस्थ देणग्या

अमेरिकेत इंडिया डेव्हलपमेन्ट अँड रिलीफ फंड (India Development And Relief Fund) आणि महाराष्ट्र फाउंडेशन (Maharashtra Foundation – New York) या दोन संस्था कार्यरत आहेत. अनिवासी भारतीयांनी यापैकी कोणत्याही संस्थांच्या माध्यमातून देणगी दिल्यास त्यांना अमेरिकेतील टॅक्सच्या नियमाप्रमाणे आयकरांत सवलत मिळू शकते. तेव्हा अनिवासी भारतीयांसाठी ही एक पर्वणी ठरू शकते. जेणेकरून

आयकरांतील सवलतीसोबतच अनिवासी भारतीय आपल्या देशातील गरजूंना मदतही करू शकतील. यासाठी अनिवासी भारतीयांना या संस्थांच्या माध्यमातून 'वात्सल्य'ला देणगी देऊन सहाय्य करावं हि विनंती. अहवालसालात भारतीय चलनाप्रमाणे इंडिया डेव्हलपमेन्ट अँड रिलीफ फंडच्या माध्यमातून रु. १४,४०,७६३/- इतकी रक्कम शैक्षणिक व कोशल्य प्रशिक्षण, आर्थिक व सामाजिक सुधारणा आणि अर्भकालय या उपक्रमांसाठी संस्थेला देणगी म्हणुन मिळाली आहे.

**अहवालसालात मिळालेल्या काही प्रमुख देणग्या खालीलप्रमाणे**

| | |
|---|---|
| श्री. रामपूरवाला फकरुद्दीन – न्यूझीलंड | रु. २,१८,९३८/-. |
| श्री. कानसकर नितीन व मित्रपरिवार – अमेरिका | रु. ७८,१८६.२५ |
| श्री. विनोद कृष्णन – केरळ | रु. ७०,०००/- |

**स्वित्झर्लंडमधील प्रसिद्ध उद्योजक श्री. एन्थोनी फर्मेनीच गेली अनेक वर्षे 'वात्सल्य' च्या सानपाडा प्रकल्पामधील बालिकाश्रमातील मुलींचा खर्च देणगीरूपाने देतात. अहवालसालात त्यांनी रु. २२,७६,९७५/- इतकी मोठी रक्कम देणगी म्हणून दिली आहे. त्यांचे शतश: आभार**

## सरकारी अनुदान

अहवालसालात जिल्हा महिला आणि बाल कल्याण अधिकारी चेंबूर कडून संस्थेला रु.**२,८०,५७३/-** इतके अनुदान प्राप्त झाले. सर्व संबंधित अधिका-यांचे मी आभार मानतो.

## कंपन्याचं सामाजिक दायित्व [CSR] व इतर कंपन्या / संस्थांचा सहयोग

केंद्र सरकारने पारित केलेल्या कंपनी कायदा २०१३ यामधील कलम १३५ अन्वये ज्या कंपन्यांचा वार्षिक नफा रु. ५ कोटी अथवा त्याहून अधिक आहे अशा कंपन्यांनी त्यांच्या नफ्यातील २ टक्के इतकी रक्कम सामाजिक बांधिलकीच्या अनुषंगाने समाजोपयोगी कार्य करणा-या संस्थांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी खर्च करावी अशा सूचना दिल्या आहेत. या नियमानुसार अहवालसालात संस्थेला काही प्रथितयश कंपन्यांनी भरघोस आर्थिक सहाय्य दिलं. त्यांचा मी शतश: ऋणी आहे. या कंपन्यांची नावे खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| १. एन.एस.डी.एल. ई-गव्हर्नस इन्फ्रास्ट्रक्चर लि. लोअर परेल | रु. ९०,००,०००/- |
| अर्भकालय ६०,००,०००/- | |
| आणि पुनर्वसन केंद्र – ३०,००,०००/- | |
| २. आर.पी.जी. फाऊंडेशन | रु. १३,८३,१५०/- |
| रुग्ण सहाय्यक प्रशिक्षण वर्ग (कांजुरमार्ग) रु. ९,६१,६५०/- | |
| रुग्ण सहाय्यक प्रशिक्षण वर्ग (सानपाडा) रु. ४,२१,०००/- | |
| ३. एस.बी.आय कॅप सिक्युरिटीज लि. | रु. १२,४०,०००/- |
| ४. नेक्स्ट पॉलीमर्स लि.- पुनर्वसन केंद्र | रु. ६,५०,०००/- |
| ५. सेमिक्रॉन इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि. | रु. ६,५०,०००/- |
| 'दिशा' आउटरिच उपक्रम व पुनर्वसन केंद्र | |
| ६.अल्वारेज अँड मार्सल इंडिया प्रा. लि. | रु. ५,२७,८००/- |
| बालिकाश्रम रु. १,५०,०००/- | |
| आणि वृद्धाश्रम रु. ३,७७,८००/- | |
| ७.मारीवाला चॅरिटी ट्रस्ट | रु. ५,००,०००/- |
| ८.विक्रम उत्तमसिंग अँड मधु विक्रम उत्तमसिंग – वृद्धाश्रम | रु. ५,००,०००/- |
| ९.ए. अँड एम इंडिया प्रा. लि.- वृद्धाश्रम | रु. ५,००,०००/- |
| १०.युनीडिझाईन ज्वेलरी प्रा. लि. युनिट ॥- अर्भकालय | रु. ४,२०,०००/- |
| ११.लार्सन अँड टुब्रो इन्फोटेक प्रा. लि. | रु. ४,०७,८००/- |
| महिला सबलीकरण रु. ३,९२,५००/- | |
| शैक्षणिक निधी रु. १५,३००/- | |

१२.कन्सेप्ट कन्सीलिओ इंडिया प्रा. लि. रु. ३,५०,०००/-
१३.स्टेट बँक ऑफ इंडिया - सोलार पॅनलसाठी रु. २,८०,०००/-
१४.सेव्ह दि चिल्ड्रन इंडिया- PAP सानपाडा रु. २,५६,३११/-
१५.हिंदुस्तान लिवर एज्युकेशनल अँड वेलफेअर ट्रस्ट रु. २,००,०००/-
१६.कलेक्टीव्ह गुड फाऊंडेशन एलटीआय रु. १,७०,०००/-
१७.मे. किशिनचंद चेल्लाराम एज्युकेशनल ट्रस्ट – गिरगांव रु. ५०,०००/-
महिला सबलीकरण - रुग्ण सहाय्यक प्रशिक्षण वर्ग (कांजुरमार्ग)
१८.मे. दि असोसिएटेड ऑटो पार्टस् प्रा. लि. – लॅमिन्टन रोड रु. ५०,०००/-

## महाशिवरात्र व रामनवमी

गेल्या ३२ वर्षांपासून वात्सल्य ट्रस्ट, मुंबई संस्था महाशिवरात्रीच्या निमित्ताने (१) श्रीपार्लेश्वर शिवमंदिर – विलेपार्ले व (२) श्रीस्वयंभू शिवमंदिर – मोतीलाल नगर, गोरेगांव येथे मंदिराच्या विश्वस्तांच्या संमतीने संस्थेचं प्रचार / प्रसार निधी केंद्रं चालवते. अहवाल सालात दि. ११ मार्च रोजी थोड्या प्रमाणावर हे केंद्र ) श्रीपार्लेश्वर शिवमंदिर – विलेपार्ले चालवले गेले. पार्ले येथील श्री. मंदार नायक, श्री. प्रमोद ओक आणि इतर सर्व कार्यकर्त्यांचे मी आभार मानतो. तसेच दोन्ही मंदिराच्या विश्र्वस्तांचेही दरवर्षी त्यांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्याबद्दल आभार मानतो.
तसेच बोरीवली येथील चोगले राम मंदिर येथे रामनवमी निमित्ताने संस्थेचं प्रचार / प्रसार निधी केंद्रं चालवले जाते. परंतु COVID 19 मुळे हे केंद्र आपण चालवू शकलो नाही.

# सानपाडा सेवा प्रकल्प

वात्सल्य ट्रस्टचा सानपाडा प्रकल्प 2000 साली सुरू नवी मुंबईत सुरू झाला. सादर प्रकल्पात बालिकाश्रम, वृद्धाश्रम, अपंग पुनर्वसन केंद्र, रुग्ण सहाय्यक प्रशिक्षण केंद्र तसेच संगणक प्रशिक्षण केंद्र इत्यादि उपक्रम राबविले जातात.

## बालिकाश्रम

अहवालसाली बालिकाश्रमात एकूण 62 मुली निवासाला होत्या. अनाथ किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील 6 ते 18 वर्षे वयोगटातील या मुलीना महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल कल्याण विभागाने नियुक्त केलेल्या बालकल्याण सामिती, ठाणे मार्फत बलिकाश्रमात दाखल केले जाते. संस्थेत दाखल असलेल्या सर्व मुलींच्या शिक्षण, आरोग्य, भोजन, कपडालत्ता, निवास इत्यादि सर्व गरजा संस्थेतर्फे पुरविल्या जातात. प्रकल्पाजवळच असलेल्या विवेकानंद संकुलातील मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळेत सर्व मुली दहावी पर्यंतचे शिक्षण घेतात. विवेकानंद संकुलाच्या सर्व पदाधिकारी, शिक्षक व कर्मचारी यांचे त्यांनी वात्सल्यला वेळोवेळी केलेल्या सहकार्या बद्दल मन:पूर्वक धन्यवाद.





करोनाच्या प्रदुर्भावामुळे पूर्ण वर्षभर ऑनलाइन शिक्षण पद्धतीचा अवलंब झाला. श्रीमती प्रियंका मक्कर आणि श्रीमती मेघा साळवी यांनी दहावीच्या मुलीना उत्तम मार्गदर्शन केले.

(1) कुमारी क्रांती पाडेकर, (2) कुमारी सुधा लाडी , (3) कुमारी सविता कांबळे, (4) कुमारी सायली जावळे, (5) कुमारी सायली गंगावणे, (6) कुमारी उर्मिला प्रताप व (7) कुमारी प्रियाज्योति शेट्टी ह्या चांगले गुण मिळवून शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्या.

संस्थेतील कुमारी पूजा शिंदेने BMS पदवी प्राप्त केली. कुमारी ममता सानप ही एमबीए झाली तर कुमारी अंजली पवार संगणक क्षेत्रात MSc झाली.

**'यू अँड आय ट्रस्ट'** च्या तरुण कार्यकर्तीनी वर्षभर ऑनलाइन पद्धतीचा वापर करून संस्थेतील मुलीना नियमित गणित विषयाचे प्रशिक्षण दिले. प्रत्येक मुली मागे एक कार्यकर्ती असे प्रशिक्षणाचे स्वरूप असल्याने मुलींच्या प्रगतीकडे वैयक्तिक लक्ष राहते व विषय सुलभतेने शिकता येतो. मुलींच्या ऑनलाइन शिक्षणाची निकड समजून 'यू अँड आय ट्रस्ट' तर्फे 4 टॅब ही मुलीना वापरासाठी देण्यात आले. 'यू अँड आय ट्रस्ट' च्या कुमारी संजना राणे व त्यांच्या सहकाऱ्यांचे मन:पूर्वक आभार.

**'यस आय कॅन ट्रस्ट '** गतवर्षी प्रमाणेच यंदाही 'यस आय कॅन ट्रस्ट तर्फे मुलीनं इंग्रजी संभाषणाचे प्रशिक्षण फोनद्वारे देण्यात आले. 'यस आय कॅन ट्रस्टच्या ट्रस्टी श्रीमती नेहा खरे व त्यांच्या कार्यकर्त्यांचे मी आभार मानतो.

करोनाच्या काळातही मुलीनी स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन, गुढी पाडवा, रक्षाबंधन, श्रीकृष्ण जन्माष्टमी, श्री गणेश चतुर्थी, नवरात्रोत्सव, दिवाळी, ख्रिसमस, होळी असे विविध सण उत्साहात साजरे केले.

**आरोग्य :** संस्थेतील मुलींची नियमित आरोग्य तपासणी केली जाते. करोंनाच्या प्रादुर्भावाचा धोका लक्षात घेता मुलींची विशेष काळजी घेण्यात आली. संस्थेतील केवळ दोन मुलीना करोनाची सौम्य लागण झाली व त्या लवकरच पूर्ण बऱ्या झाल्या ही कळविण्यास मला आनंद होत आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. विलास ऐनापुरे याची आरोग्य तपासणी केली. संस्थेपासून नजिकच असलेल्या डॉ. मानधना व डॉ. म्हात्रे यांचे मुलींवरील उपचारासाठी नेहमीच सहाय्य लाभते. दंतचिकीत्सेसाठी डॉ. श्री. गणेश शेडगे सहाय्य करतात. वाशी येथील नवी मुंबई महानगर पालिका रुग्णालय तसेच सानपाडा येथील नवी मुंबई महानगर पालिकेच्या नागरी आरोग्य केंद्र यातील डॉक्टर, सिस्टर्स व कर्मचारी यांचे त्यांनी वेळोवेळी केलेल्या सहाय्याबद्दल आभार मानू तेवढे थोडेच आहेत.

## वृद्धाश्रम

बालिकाश्रमसोबत चालवण्यात येणाऱ्या वृद्धाश्रमचा लाभ अहवाल साली तेरा जेष्ठ नागरीकानी घेतला. उत्तम आहार सोबत करमणुकी साठी वाचनालय, दूरचित्रवाणी संच, वृत्तपत्रे इत्यादींची सोय वृद्धाश्रमात आहे.
करोनाची भीती लक्षात घेता सर्व परिस्थिति सुरळीत होई पर्यन्त वृद्धाश्रमात जेष्ठ नागरिकांची संख्या मर्यादित ठेवण्यात आली आहे.



## अलिबाग सेवा प्रकल्प

७ जानेवारी २००७ रोजी वात्सल्य ट्रस्ट ,मुंबईची अलिबाग शाखा सुरू झाली . अहवाल सालात अलिबाग शाखेत एकूण १३ मुले दाखल झाली व ६ मुलांचे चांगल्या कुटुंबात पुनर्वसन करण्यात आले असून ती आनंदात रहात आहेत .४ मुलांना बाल कल्याण समिती ,रायगड यांच्या आदेशाने पालकांच्या ताब्यात दिले .

लॉकडाऊन व मुलांची सुरक्षा या कारणास्तव १४ वर्षात पहिल्यांदाच ७ जानेवारी २०२१ ची पूजा अत्यंत साधेपणाने संस्थेपुरती मर्यादित केली .वात्सल्य चे विश्वस्त व अलिबागची स्थानिक कमिटी ,सेविका व कर्मचारी वर्ग एवढेच उपस्थित होते .

संस्थेतील मुलांच्या आरोग्याची काळजी डॉ .धामणकर, डॉ .आदित्य चेवले ,डॉ .अरविंद टकले ,डॉ . परवेज शेख ,डॉ .सौरभ पाटील हे उत्तमरीत्या घेतात .संस्था त्यांची आभारी आहे .





पुनर्वसन केंद्रात येणाऱ्या मुलांच्या आरोग्याची काळजी डॉ. ऋषिकेश देशमुख ,डॉ .मनीषा मेश्राम , डॉ. आदिती गोखले ,डॉ .तांबोळी हे उत्तमरीत्या घेतात .

गेल्या संपूर्ण १ वर्षाच्या काळात अलिबागमधील विविध संघटना ,संस्था ,पक्ष ,सरकारी कार्यालये , वैयक्तिक देणगीदार, हितचिंतक यांनी भरघोस मदत केली .

- जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय ,रायगड -अलिबाग
- प्रशांत नाईक साहेब ,नगराध्यक्ष ,अलिबाग नगर परिषद
- भारतीय जनता पार्टी तालुका अध्यक्ष ,तहसीलदार कार्यालय
- राजेश दिगंबर वारंगे ,अलिबाग
- अपर्णा पडवळ ,विद्यानगर अलिबाग
- प्रवीण घरत ,अलिबाग ,भोनकर ,अलिबाग
- शक्ती फौंडेशन ,नवी मुंबई स्टार क्लब
- हेल्पिंग हँड्स ,अलिबाग

  या सर्वांनी धान्य ,बिस्किटं ,सानिटायजर dettol, phynile ,या प्रकारे वस्तुरूप देणगी देऊन संस्थेला बहुमूल्य अशी मदत केली .

## बदलापुर सेवा प्रकल्प

बदलापूर येथील भोज गावात वात्सल्याचे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहे. आठवड्यातून तीन दिवस केंद्रावर प्राथमिक आरोग्य सेवा पुरविली जाते. तसेच तीन दिवस आसपासच्या खेड्यात व पाड्यांवर जावून डॉक्टर आरोग्य तपासणी व औषधोपचार करतात. सदर प्रकल्पात वृद्धाश्रम, औद्योगिक प्रशिक्षण, आरोग्य केंद्र इत्यादी विविध उपक्रम लवकरच सुरु करण्याचा मानस आहे.

## संकीर्ण

श्री. श्रीकृष्ण देसाई यांना शैक्षणिक स्तरावरील कामगिरीसाठी सुविद्या प्रसारक संघ – बोरीवली या संस्थेने सन्मानपत्र प्रदान केले.

## श्रद्धांजली

१. वात्सल्य च्या उभारणीच्या काळातील आधारस्तंभ व संस्थापक सदस्यांपैकी एक श्री. विनोद निजसुरे यांचे दि. १३.०२.२०२१ रोजी वृद्धापकाळाने दुखःद निधन झाले.

२. संस्थेचे जुने देणगीदार श्री. मधुसूदन पणशीकर यांचे दि. १५.०९.२०२० रोजी वृद्धापकाळाने दुखःद निधन झाले.

३. संस्थेचे जुने कार्यकर्ते व दत्तक पालक श्री. दिलीप अ. आपटे यांचे दि. २८.०२.२०२१ रोजी दुखःद निधन झाले.

## विशेष सूचना

संस्थेचे ताळेबंद आणि आय व्यय पत्रके संक्षिप्त स्वरूपात देण्यात आली आहेत. ज्याना सविस्तर पत्रके पाहिजे असतील त्यांनी कृपया संस्थेच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

पर्यावरण विषयी विशेष जागरूकता लोकांच्या मनात निर्माण झाली आहे. त्यादृष्टीने ज्याना शक्य आहे अशा हितचिंतकानी आपला ई - मेल आय. डी . कळवावा. त्यायोगे संस्थेला त्यांच्याशी संपर्क साधणे सुलभ होईल.

## वेबसाईट

आपण वात्सल्यचे संकेतस्थळ **www.vatsalyatrustmumbai.org** येथे जरूर भेट द्यावी.

## संस्थेचे कार्यकर्त, देणगीदार व मान्यवरांना नम्र विनंती

संस्थेचे अनेक कार्यकर्ते निधी संकलनासाठी पावती पुस्तके, दिवाळी भेट कुपन्स घेऊन जातात पण वेळच्यावेळी ती पुस्तके व जमा केलेला निधी कार्यालयात आणून देत नाहीत. परिणामी लेखापरीक्षणाला ऑडी)टविलंब ( होतो. तरी सर्व कार्यकर्त्यांनी याबाबत काटेकोरपणा पाळावा व काही अडचण असल्यास कार्यालयाशी संपर्क साधावा ही विनंती .आमचे कार्यकर्ते आपल्यापर्यंत देणगी आणण्यासाठी पोहोचू शकले नाहीत तर गैरसमज करून न घेता आपल्या देणग्या धनादेशाद्वारेसंस्थेला टपालाने अथवा कुरिअरने पाठवाव्यात .देणगीदार आमची अडचण समजून घेतील याची खात्री आहेच. त्याचबरोबर ज्यांना शक्य आहे अशा मंडळीनी संस्थेशी ईमेल-ने संपर्क साधावा.

### ANNEXURE 'A' – GENERAL DONATIONS

| | |
|---|---|
| Smt. Chitins Sujata - | Rs. 74,760/- |
| Shri. KV Satheesh Kumar & Mrs. Rohini – Kanjurmarg | Rs. 70,000/- |
| M.V. Samant Charitable Trust – Bandra | Rs. 70,000/- |
| Shri. Changrani Chandur Sobhraj – Mahim | Rs. 69,174/- |
| Shri. Nanche Tushar – Sion | Rs. 57,000/- |
| Shri. Gokhale Pranav – Gaodevi | Rs. 56,000/- |
| Shri. Murudkar Minanath – Kalyan | Rs. 55,000/- |
| Smt. Parpiani Kirtika & Jaish – Bhandup | Rs. 55,000/- |

**Rs. 51,000/- per**

Mr. Daga Satyen – Borivali, Shri. Mahajan Sharadchandra M – Andheri, Shri. Velangi Abhijit - Thane

**Rs. 50,001/-**

Shri. Thakur Hemantkumar - Mulund

**Rs. 50,000/- per**

Shri. Bapat Vishwas – Pune, M/s. Datta Meghe World Academy, M/s. Fugro Survey (India) Pvt. Ltd., Nerul, M/s. Gan Ram Industries – Sion, Shri. Ghaisas Kedar - Pune, Shri. Gokhale Sameer Mukund – Pune, Shri. Murugan Pugalenthi - Thane, Shri. Nirantar Rajendra B. – Pune, Shri. Pokale Sachin - Roha, Shri. S. R. Kaarthik - , Smt. Satardekar Neela – Borivali, M/s. Sedan Speciality Chem. Pvt. Ltd. – Badlapur, Smt. Shetty Rekha – Kurla, Shri. Shirolkar Hemant – Borivali, Smt. Takle Madhavi Rajendra – Andheri, Shri. Tendulkar Arun – Dadar, Shri. Thakkar Amrutlal H. – Mulund, Shri. Walkade Narayan S. – Goa

**Rs. 49,500/-**

Smt. Rekhi Pallavi – Nerul

**Rs. 46,000/-**

Smt. Bhambure Rekha Ashok – Bhandup

**Rs. 42,000/-**

Smt. Joshi Vaishali Vinay - Thane

**Rs. 40,000/- per**

Smt. Deobhakta Tara – Vashi, M/s. Geetanjali Grahak Sangh – Panvel, Shri. Salvankar Chandrahas – Nerul, Shri. Shah Kartik – Ghatkopar, Shri. Soman Mangesh - Thane

**Rs. 37,000/-**

Shri. Padgaonkar Prashant – Alibag,

**Rs. 35,000/-per**

Shri. Chakraborty Supratik – Powai, Shri. Lele Swapnil – Borivali, Shri. ROHAN PR - , Shri. Rosemary Kurian – Chennai, Shri. Sathe Aaneet Arvind – Pune, Shri. Singh Ajit – Powai,

**Rs. 31,000/- per**

Shri. Patil Dipti Pradip – Chembur, Shri. Pawar Akshay Ramakant – Bhandup, Shri. Venkatram Subramaniam- Bangaluru

**Rs. 30,000/-per**

Shri. D. Chakraborty – Sanpada, Shri. Hadikyal Rohit & Raja – Powai, Shri. Joshi Vinayak – Girgaon, Shri. Kakade Devendra – Alibag, Smt. Karanjikar Rajashri - Mulund, Shri. Kasbekar Devidas – Chandigarh, Smt. Nerurkar Seema L. – Andheri, Shri. Pathre Omkar – Alibag, Shri. Prabhu Narayan – Borivali, Smt. Pratinidhi Uma Shrikant – Pune, Shri. Rastogi Satish – Mulund, Shri. Tamhane Tushar – Sanpada, Smt. Tungare Juilee Kunal – Wadala, Shri. Vengurlekar Mahendra

**Rs. 29,500/-**

Shri. Powale Avinash - Ghatkopar

**Rs. 27,000/-per**

Shri. Sidhaye Gajanan – Jogeshwari, Shri. Mangaonkar Ganesh S. – Sea Woods

**Rs. 25,500/-**

Smt. Nandini Prakash – Vikhroli

**Rs. 25004.72**

Smt. Mhaskar Surekha Jivaji - Pune

**Rs. 25,001/-**

Shri. Kubasad Shivayogi – Vikhroli

**Rs. 25,000/- per**

Shri. Abhyankar Parag – Andheri, Shri. Abhyankar Vinay - Kalwa, Smt. Bhalerao Suvarna – Sea Woods, Shri. Bharadwaj Ram, Shri. Chavan Nilesh S. – Shrivardhan, Shri. Chitale Vinayak – Andheri, Shri. Devnani Gokal K. – Chembur, Shri. Divekar Bhavanishankar – Mahim Shri. Ghate Ganesh – Mulund, Shri. Ghatpande Keshav – Mulund, Smt. Honarao Sarita N. - Mulund, Smt. Hegde Laxmi – Thane, Shri. Hosangadi Prashant – Wadala, M/s. Jai Engineering Works – Andheri, Shri. Jahagirdar Umesh – Thane, Shri. Jani Jayesh – Dahisar, Smt. Jathar Kunda – Vashi, Smt. Jayanthi Raja – Lower Parel, Shri. Joshi Amit K. – Vile Parle, Shri. Joshi Shrirang – Pune, Smt. K. Sathyabhama, - Belapur, Shri. Kalyani Nikhil - Ghatkopar, Smt. Kamat Anuradha – Nasik, Shri. Kamath Nitin K. – Kanjurmarg, Shri. Karthik Krishnan – Mulund, Shri. Kesh Vimal - , Shri. Khanna R.K. – Juhu, Smt. Lotankar Sanali – Ghatkopar, Shri. Mainkar Nikhil- , Shri. Meher Ravindra - Vashi, Smt. Mhadnak Shubhangi – Chunabhatti, Shri. Moses Romiel - Powai, Shri. N.V. Raman - Chembur, Shri. Naik Bhupendra – Thane, Miss. Naik Shadwal Ulhas – Dahisar, Smt. Narwadkar Gauri - Thane, Shri. Nerkar Suresh – Goregaon, Shri. Nerurkar Shailesh – Vile Parle, Shri. Patil Utkarsha – Kalwa, Prem Shanti Trust- Vashi, Shri. Ranade Mohan – Thane, Shri. Raut Bakul – Belapur, Shri. Ringe Laxman – Mahim, Shri. S. Gopinathan - Kerala, Shri. S. Sathya Narayan – Tamilnadu, Shri. Salukhe Mandar – Thane, Shri. Satoskar Rajesh – Nahur, Shri. Satpute Manoj – Bhandup, Shri. Shenoy Nityanand – Thane, Smt. Shamala , Shri. Shirodkar Vaibhav – Mulund, Smt. Vaidya Sarita – Dombivali, Shri. Vinod Krishnan – Kerala, Smt. Vrindha Viswanathan – Powai,

**Rs. 24,990/-**

Smt. Deolikar Latika S. – Mulund

## ANNEXURE 'B' – CORPUS DONATIONS

**Rs. 66,000/-**

Shri. Tanak Sanjeev – Thane

**Rs. 51,000/- per**

Smt. Agashe Kalpana – Mahim, Shri. Chogle Swapnil Ratnakar - Borivali, Smt. Dube Saraswati – Borivali, Shri. Joshi Samir – Santacruz

**Rs. 50,000/- per**

Shri. Chaubal Krishnakumar – Thane, Smt. Datar Sarita Arun – Vileparle, Shri. Date Anil Waman – Powai, M/s. INSIGNIAN HOME PVT LTD. – Bhiwandi, Smt. Joshi Suneela Vijay – Thane, Smt. Junnarkar Mohita Anant – Thane, Shri. Kamath Ramnath N. – Kanjurmarg, Smt. Kurup Sarojini – Powai, Smt. Mundle Archana – Vile Parle, Shri. Pisal Vijay – Sanpada, Shri. Poopal Atul – Borivali, Smt. Punalekar Sudha – Borivali, Smt. Samant Surekha – Goregaon,

**Rs. 30,000/-per**

Abhivruddha Solutions LLP – Sanpada, Shri. Dingankar Shashikant – Girgaon, Smt. Gore Vasanti – Tardeo, Smt. Pratinidhi Uma - Pune

**Rs. 29,500/-**

Dr. Deshmukh Santosh – Girgaon,

**Rs. 27,000/- per**

Shri. Mangaonkar Ganesh – Sea Woods, Smt. Naik Sangeeta – Thane, Shri. Pansare Sakharam - Sanpada

**Rs. 25,111/-**

Shri. Gogate Aravind – Vasai

**Rs. 25,000/- per**

Shri. Agashe Laxman - Mulund, Smt. Bhaigade Namrata – Sanpada, Smt. Damle Sagarika – Dadar, Smt. Deo Nivedita – Vile Parle, Smt. Deodhar Aishwarya – Thane, Shri. Desai Anup - Bhandup, , Shri. Ghanekar Mahesh – Bhandup, Smt. Gore Nanda - Thane, Shri. Gupta Pramod - Powai, Smt. Handa Pooja – Sanpada, Smt. Jadhav Lata – Thane, Shri. Jog Shubhanand – Prabhadevi, Shri. Kane Vishwanath - Thane, Shri. Lagu Santosh – Vile Parle, Shri. Mundkur Premanand – Vile Parle,Shri. Mysorekar Krishankumar – Dombivali, Shri. Nair Jayendran – Sanpada, Shri. Patwardhan Bipin – Vile Parle, Smt. Phadnis Mrunal Pankaj – Thane, Smt. Pitkar Bhagyashree – Mulund, Shri. Pudage Ashutosh – Koparkhairane, Smt. Raskar Varsha – Sanpada, Smt. Rath Savita - Mulund, Shri. Risbood Niranjan – Ghatkopar, Smt. Sabnis Vasudha - Andheri, Shri. Sardesai Viraj – Vile Parle, Smt. Sathe Nilima – Kurla, Shri. Shidhore Krishnaji - Andheri, Shri. Talreja Rajat – Sea Woods, Smt. Tank Naya Arvind – Sanpada, Smt. Tank Sara Arvind - Sanpada

## ANNEXURE 'C' – FINANCIAL ADOPTION SCHEME

| | |
|---|---|
| Smt. Mishra Sumati – Kanjurmarg | Rs. 50,000/- |
| Shri. Somaiya Ajit – Mulund | Rs. 41,512/- |
| Shri. Baveja Niraj – Mulund | Rs. 35,600/- |
| Shri. Mundhe Nikita & Neha - Mulund | Rs. 33,200/- |
| Smt. Bhave Anuradha – Vile Parle | Rs. 25,000/- |
| Shri. Joshi Shrirang – Pune | Rs. 25,000/- |
| Shri. Joshi Vinayak- Girgaon | Rs. 25,000/- |
| Smt. Gaikwad Sachin - Kanjurmarg | Rs. 25,000/- |
| Shri. Karanjikar Rajashri - Mulund | Rs. 25,000/- |
| Shri. Lele Swapnil - Borivali | Rs. 25,000/- |
| Shri. Shah Kartik - Ghatkopar | Rs. 25,000/- |
| Shri. Shirodkar Vaibhav – Mulund | Rs. 25,000/- |
| THL Metals LTD -Andheri | |

**Other donors name**

Smt. Pitre Saumita – Dadar, Shri. Sajith Sasikumar – Goregaon, Shri. Deorukhkar Ashok – Thane, Shri. Deshpande Vaibhav – Dombivli, Smt. Kulkarni Geeta – Thane, Shri. Gohil Bhavin – Princess Street, Shri. Kewalramani Srichand – Santacruz, Shri. Prajapati Jayantbhai – Kanjurmarg, Shri. Sonawane Sameer - Nerul, Shri Gohiya Shailendra – Kalyan, Shri. Anchan Suresh – Vikhroli, Shri. Deshpande Sanjeev- Kalyan,

## ANNEXURE 'D' FOREIGN DONATIONS

| | |
|---|---|
| Ms. Moorkoth Nilima - Palentine | Rs. 50,000/- |
| Ms. Bhadkamkar Jyotsna Shriniwas – Dubai | Rs. 35,000/- |
| Mr. Waingankar Prasad – America | Rs. 27,531/- |

| | | |
|---|---|---|
| Mr. Waikar Amit, China | Rs. | 25,000/- |